**महाराष्ट्र शासन**

**महाराष्ट्र कारागृह विभाग**

**नागपूर मध्यवर्ती कारागृह,नागपूर-440020**

**दुरध्वनी क्रमांक-0712-2461413**

**ईमेल :-nagpurcp-mh@gov.in**

**बेवसाईट-www.mahaprison.gov.in**

**दरपत्रक सुचना-कारागृह उद्योग-बेकरी विभाग**

दि. ११/०५/२०२६

जा.क्र.नामका/कारखाना/बेकरी विभाग/दरपत्रक निवीदा/ 4159 /2026 दि. 11/05/2026

नागपुर मध्यवर्ती कारागृहातील बेकरी विभागाकरीता सन 2026-27 या वित्तीय वर्षाकरीता आवश्यक कच्चामाल खरेदीसाठी ई-दरपत्रक निवीदा जाहिरात कारागृह विभागाच्या www.mahaprison.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. त्याबाबत सहभाग घेणाऱ्या व्यापाऱ्यांना तांत्रिक बाबी व दरपत्रक सादर करण्याचा कालावधी दि.02/05/2026 ते दि.10/05/2026 सायंकाळी 5.00 वाजेपर्यत असून नागपूर मध्यवर्ती कारागृहाच्या मुख्यदारासमोरील पेटीत सिलबंद तांत्रिक लिफाफा व सिलबंद दरपत्रक लिफाफा टाकण्याबाबत व मा. अधिक्षक यांचे दालनात दि.11/05/2026 रोजी सायंकाळी 5.00 वा. दरपत्रक उघडण्याबाबत सुचित करण्यात आले होते. त्यानुसार ई-दरपत्रक निवीदा जाहिरात कालावधी संपल्यानंतर कारागृहाच्या मुख्यदारासमोरील सिलबंद दरपत्रक पेटी कारागृहात घेण्यात आली. सदर ई-दरपत्रक निवीदा प्रक्रियेवर अंतिम निर्णय घेण्यासाठी दि.11/5/2026 रोजी सायंकाळी 5.00 वाजता मा. अधिक्षक यांचे दालनात सर्व खरेदी समितीमधील सदस्य यांचेसमक्ष सिलबंद पेटी उघडण्यात आली त्यावेळी सदर पेटीमध्ये लोहारकाम विभागाचे तांत्रिंक लिफाफे 03 नग व दरपत्रक लिफाफे 02 नग सिलबंद लिफाफे आढळून आले. सहभाग घेतलेल्या व्यापाऱ्याची नावे पुढीलप्रमाणे :-

1) **बाहेती ब्रदर्स नागपूर**

2) **युनियन ट्रेडींग नागपूर**

3 ) **लवली मॅचिग व स्टेशनरी, कोल्हापूर.**

सदर प्राप्त झालेले बेकरी विभागातील सिलबंद लिफाफे मधील प्रथम तांत्रिक लिफाफे समिती समक्ष उघडून कागदपत्राची छानणी करुन तांत्रिक कागदपत्रे पडताळणी करुन तांत्रिक बाबी तपासणीचा तुलणात्मक तक्ता तयार करण्यात आला. तुलणात्मक तक्तानुसार सर्व प्राप्त निवीदाधारकाचा तांत्रिक बाबीची पडताळणी केलेली असता अ.क्र.1)**बाहेती ब्रदर्स नागपूर** या निवीदाकार यांनी सादर केलेल्या कागदपत्रामध्ये लायसन्स परवाना हा Manufacture of metal household articles,wholesale of metals and metal ores संदर्भात आहे त्याबाबत खुलासा वा स्पष्टीकरण सादर करण्यास संस्थेचे प्रतिनिधी हजर नाहीत त्यामुळे त्यांना तांत्रिक दृष्टया अपात्र करण्यात आले व अ.क्र.2) **युनियन ट्रेडींग नागपूर** या निवीदाकार यांनी सादर केलेल्या कागदपत्रामध्ये लायसन्स परवाना हा हार्डवेअर प्लायवुड ॲन्ड इलेक्ट्रीक स्टेशनरी जनरल विक्रेते संदर्भात आहे त्याबाबत खुलासा वा

स्पष्टीकरण सादर करण्यास संस्थेचे प्रतिनिधी हजर नाहीत त्यामुळे त्यांना तांत्रिक दृष्टया अपात्र करण्यात आले. तसेच अ.क्र.3) **लवली मॅचींग व स्टेशनरी, कोल्हापूर** या निवीदाकार यांनी सादर केलेल्या कागदपत्रामध्ये लायसन्स परवाना हा स्टेशनरी साहित्य विक्री संदर्भात आहे त्याबाबत खुलासा वा स्पष्टीकरण सादर करण्यास संस्थेचे प्रतिनिधी हजर नाहीत त्यामुळे त्यांना तांत्रिक दृष्टया अपात्र करण्यात आले व तसेच त्यांनी तांत्रिक कागदपत्रासोबत स्वतंत्र दरपत्रक निविदा लिफाफा सादर केलेला नाही.त्यामुळे सदर निविदाकाराने निविदा जाहिरात मधील अटी व शर्तीमधील अ.क्र.21 मधील (ब) ची पुर्तता केलेली नसल्याने त्यांना अपात्र ठरविण्यात आलेले आहे.

मा.शासन निर्णय, उधोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रंमाक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-3 उधोग-4 , दिनांक 1 डिसेंबर 2016 मधील प्रकरण क्र.४ मधील उप नियम 4.4.3.1 नुसार ई-दरपत्रक निवीदा प्रक्रिया राबवित असताना कमीतकमी तिन निविदाकार यांनी भाग घेणे आवश्यक आहे. उपरोक्त निविदाकार अ.क्र.1)**बाहेती ब्रदर्स नागपूर** या निवीदाकार यांनी सादर केलेल्या कागदपत्रामध्ये लायसन्स परवाना हा Manufacture of metal household articles,wholesale of metals and metal ores विक्रेते संदर्भात सादर केला आहे अ.क्र.2)**युनियन ट्रेडींग नागपूर** या निवीदाकार यांनी सादर केलेल्या कागदपत्रामध्ये लायसन्स परवाना हा हार्डवेअर प्लायवुड ॲन्ड इलेक्ट्रीक स्टेशनरी जनरल विक्रेते संदर्भात सादर केला आहे व अ.क्र. 3) **लवली मॅचींग व स्टेशनरी, कोल्हापूर** यांनी सादर केलेल्या कागदपत्रामध्ये लायसन्स परवाना हा स्टेशनरी साहित्य विक्री संदर्भात असल्याने व दरपत्रक निविदा स्वतंत्र लिफाफा सादर केलेला नसल्याने वरिल सर्व निविदाकारास अपात्र करण्यात आलेले आहे. करीता विहीत नियमानुसार कमीतकमी तीन दरपत्रके प्राप्त होणे आवश्यक असल्याने उक्त दरपत्रक प्रक्रियेस पहिली मूदतवाढ हि दि.14/05/2026 ते दि.20/05/2026 पर्यत देण्यात येत आहे.

**सुधारीत दरपत्रक निवीदा उघडण्याचा तपशिल**

**दरपत्रक सादर करण्याचे ठिकाण**:- नागपूर मध्यवर्ती कारागृहाच्या मुख्यद्वारासमोरील दरपत्रक पेटीत सिलबंद लिफाफे टाकावेत.

**दरपत्रक सादर करण्याचा दिनांक**:- दि.14/05/2026 सकाळी 9.00 ते दि.20/05/2026 सायंकाळी 5.00 वाजेपर्यत

**दरपत्रक उघडण्याचा दिनांक**:- दि.21/05/2026 सायकांळी 5.00 वाजता.

(अधिक्षक,नागपूर मध्यवर्ती कारागृह यांचे दालनात)

(उक्त दिनांकामध्ये प्रशासकीय सोईनुसार बदल होवू शकतो.)

(वैभव सु.आगे)
अधीक्षक
तथा अध्यक्ष खरेदी समिती
नागपुर मध्यवर्ती कारागृह
नागपुर

सुधारणा व पुनर्वसन
फोन क्र.0712-2461413
Email-nagpurcp-mh@gov.in

महाराष्ट्र शासन
गृह विभाग (कारागृह)

अधीक्षक, नागपूर मध्यवर्ती कारागृह
वर्धा रोड, अजनी चौक, नागपूर-440020

जा.क्र.कारखाना उद्योग/ बेकरी विभाग/दरपत्रक4160/२०२6,नागपुर मध्यवर्ती कारागृह दि.11/05/2026

**प्रति,**

**मा.अपर पोलीस महासंचालक व,**
**महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-१.**

**विषय :-** नागपूर मध्यवर्ती कारागृहातील बेकरी विभागाकरीता कच्चा माल दरपत्रकाद्वारे खरेदीकरीता सुधारीत जाहीरात कारागृह विभागाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी सादर करणेबाबत

**संदर्भ:-** 1)मा. उधोग उर्जा व कामगारविभाग शासन निर्णयक्र. भांखस-१४/प्र.क्र.८५२/भाग-३, उद्योग-४, दि.०१.१२.१६
2) मा.उधोग उर्जा व कामगारविभाग शासन निर्णयक्र. भांखस-२०२१/प्र.क्र.८/भाग-३, उद्योग-४, दि.०७.०५.२१
३) मा.शासन निर्णय क्र.एमआयएस 1019/प्र.क्र.51/2019/ अर्थसं-1 दि.17/07/2019
4) या कार्यालयाचे पत्र क्र.3748/2026 दि.30/04/2026

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते की, सन 2026-2027 करीता नागपूर मध्यवर्ती कारागृहातील बेकरी विभागाकरीता कच्चा माल खरेदी प्रक्रियेकरीता संदर्भिय पत्र क्र.2 मधील शासन निर्णयातील तरतुदीनुसार 10 लक्ष च्या मर्यादेत दरपत्रक प्रक्रिया राबवून कारागृह कारखान्यातील बेकरी विभागाकरीता कच्चा माल खरेदी करणे आवश्यक आहे.

कच्चा माल दरपत्रक प्रक्रिया सन 2026-27 करीता दरपत्रक प्रक्रियेद्वारे कच्चा माल खरेदीसाठी अधोरेखीत केलेल्या अटी व शर्ती इत्यादींची संपूर्ण माहिती कारागृह विभागाच्या संकेतस्थळावर अपलोड संदर्भिय पत्र क्र.4 नुसार करण्यात आलेली होती. मा. शासन निर्णय दिनांक 1 डिसेंबर 2016 मधील अटी व शर्तींची पुर्तता न झाल्याने सदरील ई-दरपत्रक निविदा प्रक्रियेस पहिली मूदतवाढ हि दि.14/05/2026 ते दि.20/05/2026 पर्यत देण्यात येत आहे.

दि.14/05/2026 ते दि.20/05/2026 पर्यत मुदतवाढ देण्यात येत असून कारागृहाचे वेबसाईटवर ई-सेल मार्फत सुधारीत जाहिरात अपलोड करण्याबाबत या पत्राद्वारे विनंती करण्यात येत आहे.

आपला विश्वासु

(वैभव सु. आगे)
अधीक्षक
नागपुर मध्यवर्ती कारागृह
नागपुर

प्रत-मा.कारागह उपमहानिरीक्षक,कारागृह व सुधारसेवा,पूर्व विभाग,नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.